# काकासाहेबनगर येथे ३,४६५ ग्रामस्थांची मोफत आरोग्य तपासणी

नाशिक : पुढारी वृत्तसेवा

के. के. वाघ शिक्षणसंस्था, नाशिक, के. के. वाघ फाउंडेशन, बाळासाहेब वाघ वेल्फेअर फाउंडेशन, स्माईल व स्पिनॅच यांच्या संयुक्त विद्यमाने कै. बाळासाहेब (भाऊ) देवराम वाघ यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ १४ वे आरोग्य तपासणी महाशिबिर काकासाहेबनगर (ता. निफाड) येथील के. के. वाघ शैक्षणिक संकुल येथे रविवारी (दि. १) पार पडले. यावेळी ३,४६५ ग्रामस्थांनी आरोग्य तपासणी केली.

शिबिरप्रसंगी डॉ. प्राची पवार, डॉ. अतुल पाटील, इंदोरवाला हॉस्पिटलतर्फे कान - नाक - घसा तज्ज्ञ, डॉ. स्वप्निल साखला, डॉ. संदीप पानगव्हाणे, डॉ. विकास कदम, डॉ. पूजा कदम, डॉ. निनाद थोरात, डॉ. अमित बोरसे, डॉ. गौरव कुलकर्णी, डॉ. रोहन देव, डॉ. श्वेता मुर्तडक यांनी रुग्णांची तपासणी केली. शिबिराचा अनेक गावांतील ग्रामस्थांनी लाभ घेतला.